# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः25.11.2024** **वारःसोमवार**

---

•कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या तरुणांनी राजकारणात यावं – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं मन की बातमधून आवाहन

•संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला आजपासून सुरुवात; सरकार कोणत्याही मुद्यावर चर्चेसाठी तयार असल्याचं संसदीय कामकाज मंत्र्यांचं प्रतिपादन

•विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर राज्यात सत्ता स्थापनेच्या हालचालींना वेग

आणि

•बॉर्डर गावस्कर कसोटी क्रिकेट सामन्यात भारताचं ऑस्ट्रेलियासमोर ५३४ धावांचं आव्हान

**<u>मकीबा</u>**-

राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या कुटुंबातील तरुणांनी मोठ्या संख्येनं राजकारणात यावं असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आकाशवाणीवरील 'मन की बात' कार्यक्रमात बोलताना मोदी म्हणाले की, अशा एक लाख तरुणांना राजकारणाशी जोडण्यासाठी देशात अनेक विशेष मोहिमा राबवल्या जातील.

विकसित भारताच्या जडणघडणीत युवा वर्गाची भूमिका मोठी आणि महत्वाची आहे; म्हणूनच युवा पिढीच्या संकल्पना, आकांक्षा जाणून घेण्यासाठी येत्या १२ जानेवारीला, स्वामी विवेकानंद यांच्या १६२व्या जयंती दिनी, दिल्लीत 'विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग' हा उपक्रम आयोजित केला जाणार आहे, असं मोदी यांनी सांगितलं. ते म्हणाले-
-----

समाजासाठी निस्वार्थीपणे काम करणाऱ्या तरुणांबद्दल पंतप्रधानांनी उदाहरणांसह कौतुक केलं. अशा प्रयत्नांमुळे डिजिटल लाइफ सर्टिफिकेट मिळवणाऱ्यांची संख्या 80 लाखांहून अधिक झाली असल्याचं त्यांनी सांगितलं. सरकारमध्ये डिजिटल अटकेची कोणतीही तरतूद नसल्याचा पुनरुच्चार पंतप्रधानांनी केला. अशा प्रकारच्या गुन्ह्यांना, ज्येष्ठ नागरिकच जास्त बळी  पडतात. त्यांना याबाबत जागरूक करणं आणि सायबर घोटाळ्यांपासून वाचवण्याची जबाबदारी आपली असल्याचं त्यांनी सांगितलं.

राष्ट्रीय छात्र सेना दिनानिमित्त, मोदीं यांनी कॅडेट म्हणून आपल्या दिवसांची आठवण सांगितली. एनसीसी, तरुणांमध्ये शिस्त, नेतृत्व आणि सेवेची भावना विकसित करते असं सांगून तरुणांनी मोठ्या संख्येने एनसीसीमध्ये सामील होण्याचं आवाहन पंतप्रधानांनी केलं.

जगभरातील डझनभर देशांमध्ये लाखो भारतीय आहेत, ज्यांच्या पूर्वजांच्या स्वतःच्या कथा आहेत. लोकांनी अशा कथा शोधून नमो ॲप किंवा MyGov.in वर पाठविण्याचं आवाहन पंतप्रधानांनी केलं.

जैवविविधता राखण्यात चिमण्यांची मोठी भूमिका असल्याचं सांगून मोदी यांनी वाढत्या नागरीकरणामुळं शहरांमध्ये चिमण्यांचं अस्तित्व धोक्यात आल्याबद्दल चिंता व्यक्त केली. चिमण्यांना मुलांच्या आयुष्यात परत आणण्यासाठी काही अनोख्या प्रयत्नांची उदाहरणंही पंतप्रधानांनी दिली.

'एक पेड माँ के नाम' या मोहिमेने अवघ्या पाच महिन्यांत 100 कोटी झाडं लावण्याचं महत्त्वपूर्ण यश साध्य केल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. स्वच्छतेबाबत बोलताना मोदी म्हणाले की, सरकारी कार्यालयातील अनेक दशकांच्या जुन्या फाइल्स आणि रद्दी काढण्यासाठी विशेष स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेमुळं शासकीय विभागांमध्ये आश्चर्यकारक परिणाम दिसून आले असून, मोठ्या प्रमाणात जागाही रिक्त झाल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>अधिवेशन</u>**

संसदेचं हिवाळी अधिवेशन आजपासून सुरू होत आहे. त्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं काल सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. या अधिवेशनात सरकार कोणत्याही मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी तयार असल्याचं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी या बैठकीनंतर वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. अधिवेशनादरम्यान दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी सहकार्य करण्याचं आवाहन रिजिजू यांनी विरोधी पक्षांना  केलं. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला विविध पक्षांचे नेते उपस्थित होते. संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचं कामकाज येत्या 20 डिसेंबरपर्यंत निश्चित करण्यात आलं आहे. या अधिवेशनादरम्यान उद्या, 26 नोव्हेंबरला संविधान दिन साजरा केला जाणार आहे; त्या दिवशी संसदेचं सत्र होणार नाही.

**सहकार संमेलन**

नवी दिल्लीत आयोजित आंतरराष्ट्रीय सहकार संमेलनाचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज होणार आहे. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त एका टपाल तिकीटाचं प्रकाशनही पंतप्रधानांच्या हस्ते होईल. गेल्या 1शे 30 वर्षांत प्रथमच आय सी ए अर्थात आंतरराष्ट्रीय सहकार आघाडीच्या बैठकीचं आणि संमेलनाचं आयोजन, भारतात होत आहे. केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा तसंच भूतानचे पंतप्रधान दाशो शेरिंग तोबगे आणि फिजीचे उपपंतप्रधान मनोआ कामिकामिका या संमेलनात सहभागी होणार आहेत. या संमेलनात भारताच्या प्रतिनिधी म्हणून धाराशीव इथल्या, इफकोच्या संचालिका डॉ. वर्षा कस्तुरकर देखील सहभागी होणार आहेत.

**सत्ता स्थापना**

विधानसभा निवडणुकीतल्या महायुतीच्या दणदणीत विजयानंतर राज्यात आता सत्ता स्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. राज्यात सरकार स्थापन करण्याबाबत महायुतीचे सर्व घटकपक्ष मिळून चर्चा करू, असं शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. महायुतीमध्ये विधानसभा निवडणुकीसाठी जागावाटप करताना कोणतेही मतभेद नव्हते. त्यामुळे सत्तास्थापन करतानाही मतभेद नाहीत असं ते म्हणाले. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत त्यांची पक्षाच्या गटनेतेपदी निवड करण्यात आली.

**अधि सूचना**

विधानसभा निवडणुकीच्या निकालाची अधिसूचना आणि राजपत्राच्या प्रती भारत निवडणूक आयोगाचे उप मुख्य निवडणूक आयुक्त हिरदेश कुमार आणि राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस चोक्कलिंगम यांनी काल राज्यपाल सी राधाकृष्णन यांना सादर केल्या. विधानसभा निवडणुकीमध्ये निवडून आलेल्या सदस्यांची नावं या राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहेत.

यावेळी राज्याचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी किरण कुलकर्णी, यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**शरद पवार**

विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवाची कारणं शोधून आम्ही पुन्हा नव्या दमानं उभे राहू, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी दिली आहे. ते काल सातारा जिल्ह्यात कराड इथं वार्ताहरांशी बोलत होते. नव्या पिढीला उभं करण्याला प्राधान्य असेल असं ते म्हणाले.

**भाजपा**

भारतीय जनता पार्टीच्या सदस्यता नोंदणीला काल भाजपाच्या प्रदेश मुख्यालयात प्रारंभ झाला. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, श्रीकांत भारतीय, विक्रांत पाटील, माधवी नाईक यांच्यासह पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

**ब्रिगेडियरअर्जुनमित्रा**

देशाच्या तरुण पिढीमध्ये शिस्त, साहसी वृत्ती आणि देशाची निःस्वार्थ सेवा करण्याचे गुण विकसित करण्याच्या हेतूने राष्ट्रीय छात्र सेनेची स्थापना झाली आहे. राष्ट्रीय छात्र सेना अर्थात एनसीसी दिन काल सर्वत्र साजरा करण्यात आला. या निमित्त महाराष्ट्र एनसीसीच्या पुण्यातील मुख्यालयाचे ग्रुप कमांडर ब्रिगेडियर अर्जुन मित्रा यांनी आकाशवाणी संवाद साधला. देशातल्या युवा पिढीला आवाहन करताना ते म्हणाले...

**लष्करदिनसंचलन**

पुण्यात लष्कराचं दक्षिण मुख्यालय असून येत्या 15 जानेवारी रोजी साजऱ्या होणाऱ्या लष्कर दिनाचं यजमानपद यंदा पुण्याकडे आहे. पुण्याच्या इतिहासातील हा एक मैलाचा दगड ठरणार आहे. या लष्कर दिनाच्या पार्श्वभूमीवर लष्कराच्या संचलनाची झलक असलेल्या ध्वनीचित्रफितीचं अनावरण काल गोव्यात इफ्फीमध्ये करण्यात आलं. भारतीय लष्कराचे पहिले भारतीय कमांडर-इन-चीफ म्हणून फील्ड मार्शल के.एम. करिअप्पा यांची 1949मध्ये नियुक्ती झाली. त्या घटनेच्या स्मरणार्थ लष्कर दिन संचलन आयोजित केलं जातं. गेली अनेक वर्ष दिल्लीमध्ये होणारं हे संचलन आता 2023पासून वेगवेगळ्या शहरांमध्ये आयोजित केलं जातं. त्यानुसार गेली दोन वर्ष बेंगळुरू, लखनौमध्ये लष्कर दिनाचं आयोजन झालं होतं. आता 2025च्या संचलनासाठी पुण्याची निवड झाली आहे. या वर्षीचं संचलन बॉम्बे इंजिनीअरिंग ग्रुप आणि सेंटर इथं होणार आहे. यामध्ये ड्रोन आणि रोबोटिक्स सारख्या अत्याधुनिक संरक्षण तंत्रज्ञानाच्या प्रात्यक्षिकांसह, लढाऊ प्रात्यक्षिकांचा समावेश असेल.

**संजीवन समाधी**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधी सोहळ्याला आळंदीमध्ये सुरुवात झाली आहे. यासाठी राज्यभरातून लाखो भाविक आळंदीत दाखल होत आहेत. वारी काळात शहर आणि इंद्रायणी नदीच्या स्वच्छतेचं काम हाती घेण्यात आलं आहे, अशी माहिती आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांनी दिली.

**<u>वारसाफेरी</u>-**

धाराशिव जिल्हा पर्यटन विकास समिती आणि पुरातत्व विभागाच्यावतीने काल चामर लेणी इथ वारसा फेरी आयोजित करण्यात आली होती. जिल्हा पर्यटन विकास समितीचे अध्यक्ष युवराज नळे यांनी उपस्थितांना चामर लेण्यांची माहिती सांगितली.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातल्या बॉर्डर गावस्कर कसोटी मालिकेतल्या पर्थ कसोटी सामन्यात भारताने यजमान संघापुढे विजयासाठी 534 धावांचं लक्ष्य ठेवलं आहे. पहिल्या डावातील 46 धावांच्या आघाडीसह भारतानं आपला दुसरा डाव सुरू केला होता; त्यानंतर काल भारतानं 6 बाद 487 धावांवर आपला डाव घोषित केला. विराट कोहली आणि यशस्वी जैस्वालनं दमदार शतकं झळकावली. जयस्वालनं 161, विराट कोहलीनं नाबाद 100, तर के एल राहुलनं 77 धावा केल्या. विजयासाठी 534 धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना पुन्हा एकदा ऑस्ट्रेलियाची फलंदाजी ढेपाळली. कालच्या तिसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या 3 गडी बाद 12 धावा झाल्या होत्या. जसप्रीत बूमरानं 2, तर महंमद सिराजनं एक गडी बाद केला.

**<u>हवामान</u>**

अहमदनगर इथं काल सर्वात कमी 11 पूर्णांक 7 अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**